● सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २०६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# 'विराट' शतक

## भारताचा पाकिस्तानवर सहज विजय



भारताने आपल्या पारपंरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा सात विकेट्सनी धुव्वा उडवून आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीत सलग दुसरा विजय साजरा केला. या विजयासह भारतानं चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीचे तिकीट जवळजवळ निश्चित केले आहे. न्यूझीलंडपाठोपाठ भारताकडूनही झालेल्या पराभवानं यजमान पाकिस्तानचे आव्हान जवळपास संपुष्टात आलं आहे. यासह टीम इंडियाने पॉइंट टेबलमध्ये म ोठी झेप घेतली. टीम इंडिया त्यांच्या गटात एक नंबरला गेली आहे. विराट कोहलीच्या शतकाच्या जोरावर भारताने पाकिस्तानविरूद्ध ६ विकेट्सने मोठा विजय मिळवला आहे. या विजयासह भारताने पाकिस्तानकडून २०१७ च्या फायनलमधील विजयाचा बदला घेतला आहे. कारण भारताने पाकिस्तानला पराभूत केल्याने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील त्यांचे आव्हान संपुष्टात आणले आहे. विराट कोहलीने जबरदस्त पुनरागमन करत पाकिस्तानविरूद्ध शतक झळकावले आणि भारताचा विजय निश्चित केला. विराट कोहलीने विजयी चौकार लगावला आणि भारताला विजय मिळवून दिला आणि स्वतः चे शतकही पूर्ण केले आहे.

विराट कोहलीने १११ चेंडूत ७ चौकारांसह नाबाद १०० धावा करत आपले ५१ वे वनडे शतक पूर्ण केले आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने पुन्हा एकदा २४२ धावांचे लक्ष्य कोणत्याही अडचणीशिवाय जबरदस्त पद्धतीने पूर्ण केले. टीम इंडियाच्या या विजयाचा स्टार विराट कोहली होता, ज्याने उत्कृष्ट शतक झळकावून आपल्या पुनरागमनाचा डंकाही वाजवला आहे.

भारतीय संघाने आपल्या विजयासाठी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलमध्ये आपली जागा जवळपास पक्की केली आहे. याशिवाय भारतीय संघ अ गटाच्या गुणतालिकेत पहिल्या स्थानी पोहोचला आहे. प्रथम भारतीय गोलंदाजांनी शानदार खेळ करत पाकिस्तानला कमी धावसंख्येपर्यंत रोखले, त्यानंतर भारतीय फलंदाजांनी शानदार खेळ करत सामन्यावर कब्जा केला.

२४२ धावांच्या सोप्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाने चांगली सुरुवात केली. रोहितने २० धावांचे योगदान दिले. तर शुबमन गिलने ४६ धावांचे योगदान दिले. पान २ वर

रात्री उशिरापर्यंत व्यवसाय सुरुच...

# पोलीसांचे सोयीस्कर दुर्लक्ष!



जालना । प्रतिनिधी - जिल्ह्याभरात अवैध धंद्यांना ऊत आला असून पोलीस प्रशासन ढिम्म झाले असल्याचे दिसून येत आहे. प्रतिबंधीत गुटख्याची विक्री असो, सट्टा-मटका, लॉटरी, अवैध दारु विक्री, अवैधरित्या वाळु उपसा-वाहतुक बेदीक्त सुरु आहे. त्यातच रात्री उशिरापर्यंत सुरु राहणाऱ्या व्यवसायाकडे पोलीसांचे सर्रास दुर्लक्ष होतांना दिसून येत आहे. रेल्वे स्टेशन परिसरात रात्री उशिरापर्यंत काही व्यवसाय सुरु असतात. पोलीसांचे पथक या ठिकाणांहून ये-जा करीत असले तरी या व्यवसायिकांवर कोणताही परिणाम होत नाही. त्यामुळे हे व्यवसायिक आणि पोलीस प्रशासन यांच्यात काही 'अर्थ'पुर्ण संबंध आहेत की काय अशी शंका निर्माण होण्यास वाव आहे. या प्रकाराकडे पोलीस अधिक्षकांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

# शहर मनपाचे दुर्लक्ष; स्वच्छतेसाठी नागरिक सरसावले



जालना । प्रतिनिधी - शहरातील मोती तलाव, छत्रपतीसंभाजीनगर चौफुली परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून याची तक्रार या भागातील नागरिकांनी वेळोवळी महानगर पालिका प्रशासनाला दिली तरी देखील स्वच्छता होत नसल्याने नागरिकांनी स्वतः स्वच्छता मोहिम हाती घेतली आहे.

रविवार (दि २३) रोजी मोती तलाव व परिसरात नागरिकांनी स्वच्छता मोहिम राबवत कचरा एका पान २ वर



हिंदू धर्मातील सर्वात पवित्र आणि प्राचीन परंपरांपैकी एक म्हणजे कुंभमेळा! प्रयागराजमध्ये १३ जानेवारी पासून कुंभमेळ्याची सुरुवात झालेली आहे. शास्त्रानुसार, महाकुंभ मेळा १४४ वर्षांत एकदा आयोजित केला जातो. प्रयागराज येथील महाकुंभ मेळा येथे साधु-संत, गुरु आणि भक्तांचा मोठा उत्साह पहायला मिळत आहे. जालना येथील उद्योजक घनश्यामदास गोयल, गोविंद गोयल सहपरिवार यांनी त्रिवेणी संगम शाही स्नान केले.

# एकाच्या अवयवदानाने ८ जणांना जीवदान मिळत - डॉ. सेठिया

## समृद्धी ग्रुपतर्फे अवयवदानाबाबत जनजागृती अभियान







जालना । प्रतिनिधी - अवयव दान हे समाजासाठी एक अमूल्य योगदान आहे. आपणही अवयव दानाचा संकल्प करून कोणाच्यातरी आयुष्यात प्रकाश आणू शकतो. मेंदूमृत झालेल्या एका व्यक्तीचे हृदय, यकृत, मूत्रपिंड, फ ुफ्फुसे, आतडे आणि स्वादुपिंड, म ूत्रपिंड यांसारखे अवयव गरजू रुग्णांना प्रत्यारोपणासाठी दिल्याने ८ जणांना जीवदान मिळते. शिवाय ७५ जणांचे जीवनमान अप्रत्यक्षरीत्या सुधरू शकते. मृत्यूनंतरही कोणाला नवा जन्म देण्याची संधी आपल्या हाती आहे. हे कार्य अत्यंत पवित्र आणि मानवतेला सहाय्य करणारे असल्याने व्यापक प्रम ाणात जनजागृती होऊन अवयवदान लोकचळवळ बनली पाहिजे, अशी प्रतिपादन रुबी हॉस्पिटलचे संचालक व मधुमेहतज्ञ डॉ. राजेश सेठिया यांनी येथे बोलताना केले.

येथील समृद्धी ग्रुपच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकातील गुरु गणेश मंगल कार्यालयात २१ फेब्रुवारी रोजी अवयव दानाचे महत्त्व या विषयावर आयोजित जनजागृतीपर व्याख्यानात डॉ. सेठिया बोलत होते. व्यासपीठावर समृद्धी ग्रुपच्या अध्यक्ष स्वाती मांडोत, सचिव सुरेखा श्रीश्रीमाल, कोषाध्यक्ष संगीता खिवंसरा, सल्लागार तथा प्रकल्प प्रमुख पुनम सुराणा, सहप्रकल्प प्रम ुख डॉ. उमा गादिया गादिया, राणी कुचेरिया, प्रीती खिवंसरा, मनीषा काठेड यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. सेठिया यांनी पुराणकालीन कथांचा संदर्भ देत अनादी काळापासून पान २ वर











प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) च्या जालना जिल्हाध्यक्षपदी युवा आदर्शचे संपादक दीपक शेळके यांची फेरनिवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना पहिल्या छायाचित्रात दिनेश नंद, सुनील नंद, मराठी पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष धनसिंह सुर्यवंशी, संदीप भाकरे, सेवकराम नारियवाले, भरत परदेशी, प्रदिप दिव्यवीर. दुसऱ्या छायाचित्रात संतोष भुतेकर, दिनेश नंद, नरेंद्र जोगड, तिसऱ्या छायाचित्रात भ्रष्टाचार विरोधी लोकाधिकारचे संपादक सय्यद अफसर, जालना टाईम्सचे संपादक रज्जाक बागवान. चौथ्या छायाचित्रात जालना आंदोलनचे शब्बीर पठाण, गणेश जाधव आदी. पाचव्या छायाचित्रात जय महाराष्ट्रचे गणेश जाधव, संतोष कोल्हे आदी.

# संपादकीय पान

## व्हॉट्सअप वाढदिवस!

आजचे युग हे सोशल मिडियाचे युग आहे आणि या सोशल मीडियाच्या युगात प्रत्येकाच्या मोबाईल मध्ये अनेक मेसेजिंग प्लिकेशन आहेत आपणही दररोज अनेक मेसेजिंग प्लिकेशनचा वापर करतो. या मेसेजिंग प्लिकेशनमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वाधिक वापरले जाणारे मेसेजिंग प्लिकेशन म्हणजे व्हाट्सअप. याच सर्वाधिक लोकप्रिय आणि वापरले जाणाऱ्या व्हॉट्सअप या मेसेजिंग प्लिकेशनचा आज वाढदिवस आहे. व्हॉट्सअप हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आज प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये दुसरे कोणते प्लिकेशन असो वा नसो पण व्हॉट्सअप हमखास बघायला मिळते. २४ फेब्रुवारी २००९ रोजी जेन कॉम याने व्हाट्सअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. व्हाटसअपचा निर्माता जेन कॉम याचा जन्म युक्रेन देशातील छोट्या गावात झाला. त्याचे वडील मजूर तर आई गृहिणी होती. युक्रेनमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यावर त्याचे वडील अमेरिकेत स्थलांतरित झाले. तिथे ते छोटीमोठी कामे करू लागले. जेन कॉम याला कॉम्प्युटर प्रोग्रामिंगची आवड होती. त्याच्या घराजवळच एक लायब्ररी होती. तेथून तो कॉम्प्युटर प्रोग्रामिंगचे पुस्तके आणत व घरच्या कॉम्प्युटरवर प्रोग्रामिंग करीत. पुढे त्याने कॉम्प्युटर सायन्समध्ये डिग्री मिळवून एका सॉफ्टवेअर कंपनीत सिक्युरिटी टेस्टर म्हणून काम सुरू केले. १९९७ साली याहू कंपनीने इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअर या पदावर त्याची नेमणूक केली. या कंपनीत त्याने ९ वर्ष नोकरी केली. दुसऱ्या कंपनीत नोकरी करण्यापेक्षा स्वतःची कंपनी सुरू करावी या विचाराने त्याने याहूला राजीनामा दिला. याहूमध्ये ब्रायन अकटन हा त्याचा सहकारी होता. त्यानेही याहूला राजीनामा दिला. दोघांनी मिळून स्वतःची कंपनी स्थापन करण्याचे ठरवले. त्या सुमारास ऍप्पल कंपनीने आयफोन बाजारात आणला होता. त्यात मेसेज पाठवण्याची सुविधा होती. त्यावरून त्यांना व्हॉट्सअपची कल्पना सुचली. पुढे दोघांनी त्यावर काम करण्यास सुरवात केली. या प्रयोगात त्यांना यश मिळाले का नाही हे विचारण्यासाठी त्यांच्या मित्राने त्यांना विचारले व्हॉट्सअप ! व्हॉट्सअप या शब्दाचा अर्थ होतो काय झाले ? हा शब्द कानावर पडता क्षणीच त्यांनी ठरवले आपल्या कंपनीचे नाव आपण व्हॉट्सअप हेच ठेवायचे. २४ फेब्रुवारी २००९ रोजी त्यांनी व्हॉट्सअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. सुरवातीला व्हॉट्सअपला खूपच कमी प्रतिसाद मिळाला कारण तेंव्हा अँड्रॉइड मोबाईलची संख्या खूप कमी होती पण जशी अँड्रॉइड मोबाईलची संख्या वाढत गेली तशी व्हॉट्सअप वापरणाऱ्यांची संख्याही वाढत गेली. आज व्हॉट्सअप जगातील पहिल्या क्रमांकाचे एप्लिकेशन बनले आहे. जगातील किमान दोनशे कोटीहून अधिक लोक व्हॉट्सअपचा वापर करतात. प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये व्हॉट्सअप असतेच. व्हॉट्सअपवर रोज एक लाख कोटीहून अशिक मेसेज सेंड होतात. व्हॉट्सअप वरुन दररोज ५०० कोटीहून अधिक फोटो तसेच १०० कोटीहून अधिक व्हिडीओ शेअर होतात. सुरवातीला फक्त इंग्रजीमध्ये असणारे व्हॉट्सअप आज ५३ भाषांमध्ये आहे. व्हॉट्सअप नेहमीच नवनवीन सुविधा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करुन देते. व्हिडिओ कॉल, ऑडियो कॉल, स्टेटस अशा नवनवीन सुविधा व्हॉट्सअप कडून वापरकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. आज व्हॉट्सअप वरून पैसेही पाठवता येऊ शकतात. २०१४ साली फेसबूकच्या मार्क झुकेरबर्ग याने १९ बिलियन डॉलरला जेन कॉम आणि ब्रायन अकटन यांच्याकडून व्हॉट्सअप खरेदी केले. आज व्हॉट्सअपची मालकी मार्क झुकेरबर्ग यांच्याकडे आहे. आज व्हॉट्सअप प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. आपली दिवसाची सुरुवात व्हॉट्सअपनेच होते. सकाळी झोपेतून उठल्यावर आपण जर पहिल्यांदा काय पाहत असतो तर ते व्हॉट्सअप !आपण झोपताना ही व्हॉट्सअप पाहूनच झोपतो. व्हॉट्सअप वर ग्रुपची सुविधा सुरू झाल्याने एकाच वेळी शेकडो लोकांना मेसेज पाठवण्याची सुविधा निर्माण झाली. व्हॉट्सअप वर आज कोयावधी ग्रुप आहे. केवळ मित्रांचे नातेवाईकांचे च नाही तर शासकीय नोकरांचे देखील ग्रुप आहे. शासकीय संदेश, आदेश देखील आता व्हॉट्सअप वर दिले जातात. लहान मुलांपासून थोरांपर्यंत सर्वांच्या जीवनाच्या अविभाज्य भाव बनलेल्या व्हॉट्सअपला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# साहित्य संमेलन:लोटांगण घालून स्वाभिमान कसा जपणार?

भारतातच नाही,तर जगातील इतर कुठल्याही भाषेचे साहित्य संमेलन गेली ९८ वर्षे भरत आलेले नसेल,असे मला वाटते.त्यामुळे २ वर्षांनी शंभरी गाठणारे मराठी साहित्य संमेलन हा एक जागतिक विक्रम ठरेल.

नेमेचि येतो पावसाळा या म्हणीप्रमाणे दरवर्षी संमेलन येऊ घातले की काही काही गोष्टींवर तीच तीच चर्चा,तीच तीच टीका टिप्पणी होत असते. संमेलन एकदा पार पडले की परत पुढील संमेलन येईस्तोवर सर्व कसे शांत शांत असते. या वर्ष भराच्या काळात अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ काय करीत असते,कोणास ठाऊक ?

या संमेलनावर ,दरवर्षी जे काही आक्षेप घेतले जातात,त्यातील काही प्रमुख आक्षेप म्हणजे संमेलन सरकारी अनुदानाशिवाय होऊ शकत नाही, स्थानिक आयोजक संस्था आणि त्या संस्थांच्या सूत्रधार व्यक्ती यांच्या ताब्यात

संमेलन जात असते आणि ते इतके जाते की, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ देखील काही करू न शकता बघ्याच्या भूमिकेत जाते.या संमेलनात कुठले परिसंवाद घ्यायचे,त्यासाठी कुणाला बोलवायचे ? का बोलवायचे ? हे नेमके कोण ठरवीत असते,ही तर जणू अतिशय गोपनीय बाब आहे,अशी परिस्थिती आहे. दुसरी बाब म्हणजे आर्थिक व्यवहार. एकीकडे शासन व्यवहारासाठी माहितीचा अधिकार कायदा लागू करण्यात आला आहे तर तो अशा सार्वजनिक कार्यक्रम,उपक्रमांना लागू करण्याची वेळ येऊ न देता या

साहित्य महामंडळाने ,संमेलनासाठी किती ,कसे पैसे जमा झाले,ते कसे खर्च झाले,याचा हिशेब स्वतःहून जाहीर केला पाहिजे. तसेच या संमेलनासाठी देण्यात येत असलेली लाखो रुपयांची कामे म्हणजे मंडप उभारणी, सजावट, भोजन व्यवस्था ही कंत्राटे कुणाला,कशाच्या आधारावर दिली गेली आहे, हे समाजाला कळायला हवे. एकीकडे शासनात असा नियम आहे की,कोणतीही खरेदी ( वस्तू व सेवा) ही जर ५० हजार रुपयांच्या आतील

असेल तर ३ दर पत्रके मागवून ती,त्या त्या कार्यालयाच्या खरेदी समिती समोर उघडून ,त्यांची तुलना करून काम दिले जाते. तर ५० हजार रुपयांच्या वरील खरेदी असेल तर वृत्तपत्रांत जाहिरात देऊन दर पत्रके मागवून,पुन्हा ती खरेदी समिती समोर ठेवून,त्यांची तुलना करून कामे/ कंत्राटे दिली जातात.शासनात जर ही कार्यपद्धती आहे,तर शासनाच्या अनुदानावर भरत असलेल्या या संमेलनाच्या बाबतीत ,महामंडळ ही कार्य पद्धती का अवलंबित नाही ?

काही वर्षांपूर्वी साहित्य महामंडळाने संमेलन स्वायत्तपणे भरविता यावे,यासाठी महानिधी गोळा करण्याचा उपक्रम राबविला होता.या उपक्रमामुळे किती निधी गोळा झाला, कुणी किती निधी दिला ,आता या उपक्रमाची सद्यस्थिती काय आहे? हे ही या महामंडळाने जाहीर केले नाही. खरं म्हणजे,ही एक अतिशय स्वागतार्ह कल्पना असून ती अतिशय जोरकसपणे राबविण्याची गरज आहे. त्या शिवाय महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्वतंत्र होण्यासाठी काय प्रयत्न करणे गरजेचे आहे,या विषयावर

महामंडळाने लोकांची, तज्ञांची मते, विचार, कल्पना मागवाव्यात आणि त्या दृष्टीने एक निश्चित कृती आराखडा निश्चित करून त्याची सुनियोजितपणे अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे.

यासाठी काही उपाय मला सुचतात ते म्हणजे, संमेलनात सहभागी होण्यासाठी सर्वांकडून रास्त मूल्य आकारण्यात यावे. संमेलन मोफत असू नये. तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनाचे थेट प्रक्षेपण करण्यासाठी लिलाव करून जी दूरचित्रवाणी वाहिनी अधिक ची बोली बोलेल,त्या वाहिनीला असे थेट प्रक्षेपणाचे अधिकार द्यावेत.या अशा दोन्ही उपायांमुळे भारतीय क्रिकेट मंडळ हजारो कोटी रुपयांचे धनी झाले आहे,तर साहित्य महामंडळ का होऊ शकणार नाही?

इथे आणखी एक वस्तुस्थिती विचारात घेतली पाहिजे.मुळातच भारतीय मानसिकता ही परावलंबी आहे. आपले भले एक तर ईश्वर करेल नाही तर सरकार करेल,अशा या मानसिकतेमुळे ईश्वर तर काही प्रत्यक्ष दिसत नाही,म्हणून आपण आपल्या भल्याची अपेक्षा आधी राजेशाही असताना राजा कडून करायचो तर ब्रिटिश आल्यापासून जी सरकार ची नवी व्यवस्था उदयास आली,तेव्हापासून सरकार कडून करीत आलो आहोत. त्यातूनच मायबाप सरकार ही संकल्पना पुढे येत गेली आणि सर्वांच्या रक्तात ती चांगलीच भिनत गेली. त्यामुळे आपण नेहमीच प्रजाहित दक्ष राजा आणि आता लोकशाहीत प्रजा हित सरकार ची अपेक्षा करतो आणि ती करावीही. पण मुळात प्रजा जो पर्यंत स्वहित दक्ष प्रजा होत नाही, तो पर्यंत लोकशाही पूर्णपणे रुजली ,असे म्हणता येणार नाही.अर्थात लोकशाही ही पूर्णपणे निर्दोष शासन व्यवस्था आहे,असेही नाही.पण जगात ज्या काही नऊ दहा शासन व्यवस्था आहेत,त्यांच्याशी तुलना करताना ती एक नंबरची आहे,असे मात्र निश्चितपणे म्हणता येईल.

इथे आपण असे म्हणू शकतो की, लोकशाही शासन व्यवस्थेत सरकारने अशा संमेलनाला मदत करणे ही सरकारची जबाबदारी आहे. पण सरकारची ही जबाबदारी पार पाडण्यासाठी सरकारमधील व्यक्ती महत्वाच्या ठरतात.त्यामुळे मनधरणी करणे,त्यांचे ऐकणे हे ओघाने येतेच. ते कसे टाळता येईल ? उद्या मी किंवा तुम्ही जरी सत्तेवर आलो,तरी आपणही तेच करू. आपण पूर्णपणे निस्पृह राहू शकू,याची आपण तरी हमी देऊ शकतो का? त्यामुळे आपण व्यवस्थाच अशी निर्माण केली पाहिजे की ,ती व्यवस्थेच्या आधारेच सक्षमपणे चालली पाहिजे, कुठल्या व्यक्तीच्या आधारे नव्हे !

या निमित्ताने आपण आताच जर असा संकल्प केला की, शंभरावे आणि त्या पुढील सर्व साहित्य संमेलने, साहित्य व्यवहार असे सर्व काही,साहित्य महामंडळ स्वतःच्या ताकदीने करेल आणि त्या साठी या महामंडळाला आपण ताकद दिली पाहिजे,तरच साहित्य संमेलन कुणाच्या हातात गेले,ते कुणी कसे वापरून घेतले अशा या काही बाबींना कायमचा आळा बसेल,असे मला वाटते .तुम्हाला काय वाटते ?

**देवेंद्र भुजबळ**
**९११९८६९४५४८००**

### होमिओ वर्ल्ड व्हिजन २०२५

# दोन दिवसीय परिषद संपन्न



**पुणे । प्रतिनिधी -** होमिओपथीचे परिणाम चांगले आहे हे आता दुसऱ्यांना समजून देण्यासाठी पेशंटचा केस-स्टडी करून यांचे उपचारापूर्वी आणि उपचारानंतरचे पुरावे सादर केले तर लोकांचा विश्वास होमिओपॅथीवर वाढेल. टेक्नॉलॉजीला जोडून काम करण्याचे आवश्यकता आता आहे. बदलत्या युगाप्रमाणे ए.आय. चा उपयोग करून आपला डेटा संग्रहित करण्याची गरज प्रत्येकाला भासणार आहे. असे प्रतिपादन भारत सरकारच्या होमिओपॅथी राष्ट्रीय आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल खुराणा यांनी केले.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ होमिओपॅथिक फिजिशियन संस्थेच्या वतीने 'होमिओ वर्ल्ड व्हिजन २०२५' या दोन दिवसीय परिषद २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी स्वामी विवेकानंद सभागृह, एम.आय.टी कोथरूथ येथे आयोजीत करण्यात आली होती. प्रसंगी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष तन्वीर हुसैन, पद्मश्री वी.के. गुप्ता, डॉ. निशिकांत थापे, डॉ. अजित कुलकर्णी, प्रो. डॉ. एम.ए. राव, डॉ. कुमार ढवळे, प्रो. डॉ. आर. रामय्या, मिलिंद निकुण, डॉ. मंगेश जतकर, डॉ. निरंजन मोहंती, डॉ. सुधांशू आर्या, डॉ. हरीश शिंदे आदि उपस्थित होते.

परिषदे दरम्यान डॉ. अनिल खुराना यांना पद्मश्री डॉक्टर के. जी सक्सेना मेमरीवर लाईफ टाईम अच्युमेंट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राजर्षी श्री छत्रपती शाहू महाराज मेलोरियल होमिओ विशिष्ट सेवा पुरस्काराने डॉक्टर रमाकांत दगडे यांना गौरवण्यात आले. डॉ. जी. एल. एन. शास्त्री मेमोरियल होमिओ विशिष्ट सेवा पुरस्काराने डॉक्टर जी. श्रीनिवासुल यांना प्रदान करण्यात आला तर डॉ रविंद्र कोचर यांना देखील सोहळ्याप्रसंगी सन्मानित करण्यात आले. पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व शाल असे या पुरस्काराचे स्वरूप होते. संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. वैजयंती नगरकर मुख्य (वैद्य अधिकारी आयुष डिपार्टमेंट, स्वास्थ्य मंत्रालय) डॉ. एम. ए. राव व डी. एस. एच. मेडिकल कॉलेजच्या प्राचार्य मनीषा सोलंकी यांनी विशेष प्रयत्न केले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ वैजयंती नगरकर व अर्पि बारोट यांनी तर आभार डॉ. दहाड यांनी मानले.

# जालना बाजार समितीत आतापर्यंत ७७ हजार ११३ क्विंटल हरबऱ्याची आवक

**जालना । प्रतिनिधी -** बाजार समितीत यंदा हरबऱ्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आतापर्यंत ७७ हजार ११३ क्विंटल हरबऱ्याची आवक जालना बाजारात झालीय. ७ हजार ५०० ते ६ हजार २०० रुपये प्रति क्विंटल असा भाव सध्या जालना बाजारात हरबऱ्याला मिळत आहे. गेल्या वर्षी जालना बाजार समितीत फक्त ७ हजार ५६९ क्विंटल हरबऱ्याची आवक झाली होती आणि त्याला सुमारे ६ हजार ५०० ते ६ हजार ४०० रुपये प्रति क्विंटल असा दर मिळाला होता. यंदा, मात्र जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात हरबरा लागवड केल्याने हरबऱ्याचे लागवड क्षेत्र वाढले आणि परिणामी जालना बाजारात हरबऱ्याची आवक वाढल्याच चित्र पाहायला मिळत आहे.

## जालना-खामगाव रेल्वे मार्गासाठी

# बैलगाडी यात्रा काढणार

### रेल्वे संघर्ष समितीचा ईशारा

**जालना । प्रतिनिधी -** जालना -खामगाव रेल्वे मार्ग मंजुरीसाठी बैलगाडी यात्रा काढणार असल्याचा ईशारा रेल्वे संघर्ष समितीने दिला आहे.केंद्रीय आयुष मंत्री प्रताप जाधव यांच्याशी केलेल्या चर्चेनंतर हा ईशारा देण्यात आला. जालना ते खामगाव असा बैलगाडी मोर्चाचा रुट ठरवण्यात आला असून या रेल्वे मार्गाबाबत निर्णय घेतला गेला नाही तर जालना आणि बुलडाणा जिल्ह्यातील ठिकठिकाणचे रेल्वे कृती समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते नागरीक आणि प्रतिष्ठित नागरीक देखील या मोर्चात सहभागी होणार असल्याची माहिती आज दिनांक २३ रविवार रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास रेल्वे संघर्ष समितीचे महासचिव फिरोज अली यांनी रेल्वे स्टेशन परिसरातील टिपू सुलतान चौकात माध्यमांशी बोलताना दिली आहे.जालना - खामगाव रेल्वे मार्ग होण्यासाठी नागरीकांनी आम्हाला पाठिंबा द्यावा असंही रेल्वे संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे याशिवाय जालना-बिड रेल्वे मार्गाबाबत देखील आम्ही आवाज उठवणार असल्याचे रेल्वे संघर्ष समितीचे पदाधिकारी म्हणाले.

पान १ वरुन

## विराट शतक ...

याशिवाय श्रेयस अय्यर आणि विराट कोहली यांनीही उत्कृष्ट कामगिरी केली. अय्यरने ६७ चेंडूत ५६ धावा करत अर्धशतकी खेळी केली. तर विराट कोहलीने या सामन्यात दमदार शतक झळकावून पाकिस्तानला पराभवाचा धक्का दिला. कोहलीने १११ चेंडूत १०० धावांची नाबाद खेळी खेळून पाकिस्तानला खिंडार पाडले. विराट कोहलीने शुबमन गिल आणि श्रेयस अय्यरसह मोठी भागीदारी रचत संघाच्या विजयाचा पाया रचत विजय मिळवून देत नाबाद माघारी परतला. भारताकडून कुलदीप यादवने सर्वाधिक ३ विकेट घेतले. त्याच्याशिवाय हार्दिक पांड्याने २ विकेट घेतले.

तत्पूर्वी पाकिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय सुरूवातीला योग्य ठरत होता कारण, टीम इंडियाला सुरुवातीला विकेटसाठी थोडी वाट पहावी लागली. बाबर आझम येताच त्याने काही उत्कृष्ट फटके मारत पाकिस्तानला अपेक्षेपेक्षा चांगली सुरुवात करून दिली. पण हार्दिक पांड्याने त्याची विकेट घेताच त्याचा सलामीचा जोडीदार इमाम उल हकही पुढच्याच षटकात बाद झाला. इथून पाकिस्तानी संघ अडचणीत दिसत होता पण कर्णधार मोहम्मद रिझवान आणि सौद शकील यांनी उत्कृष्ट भागीदारी करत संघाला सांभाळले. दोघांनी मिळून शतकी भागीदारी केली.

रिझवान शकीलने ११ ते २० षटकांत मिळून अवघ्या २७ धावा केल्या आणि भारताच्या गोलंदाजीपुढे त्यांना मोठे फटके खेळण्याची संधी मिळाली नाही. सौद शकीलने उत्कृष्ट अर्धशतक झळकावले पण रिझवान लवकर बाद झाला. दोघेही बाद झाल्यानंतर खुशदिल शाहने शेवटी काही मोठे फटके मारले आणि संघाला २४१ धावांपर्यंत पोहोचवले.

## शहर मनपाचे ...

ट्रॅक्टरमध्ये गोळा केला असून त्याची कचरा डेपोत विल्हेवाट लावण्यात येणार आहे. मुळात स्वच्छतेचे कार्य हे मनपा प्रशासनाचे आहे. मनपा प्रशासनाकडून स्वच्छतेसाठी कोटींचा खर्च केला जातो. त्याच बरोबर ईतर सामाजिक संघटनांकडून वेळोवेळी स्वच्छता मोहिम राबविल्या जात असते. पहाटेपासून स्वच्छता कर्मचारी रस्त्यावर उतरलेले असतात. घंटागाड्या फिरताहेत, तरी देखील कचऱ्याचे ढिग दिसून येताहेत. स्वच्छतेसाठी होणारा खर्च आणि त्या बदल्यात होणारी स्वच्छता याचा ताळमेळ मनपा प्रशासनाने बसविणे गरजेचे आहे. याकडे आयुक्तांनी वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

## एकाच्या अवयवदानाने ...

चालत आलेल्या अवयव दानाची महती विशद केली. महर्षी दधीची ऋषींनी मानवतेच्या रक्षणासाठी स्वतःचा प्राण त्याग करून आपली हाडे देवांना दान केली. त्या हाडापासून इंद्राचे वज्रायुध, अर्जुनाचे गांडीव, रामाचे सारंग तर शिवाचे पिनाक हे प्रभावी अस्त्र बनले आणि त्यांनी त्या माध्यमातून मानवतेचे रक्षण केले. आपणही अवयव दानाचा संकल्प करून कोणाच्यातरी आयुष्यात प्रकाश आणू शकतो. मृत्यूनंतरही कोणाला नवा जन्म देण्याची संधी आपल्या हाती आहे. अवयव दान जिवंतपणी आणि मृत्यूनंतर अशा दोन प्रकारे करता येते. जिवंतपणी एक किडनी, एक फुफ्फुस आणि स्वादुपिंड, यकृत आतड्याचा एक भाग दान करता येतो. मृत्यु पश्चात डोळे, दोन किडनी, दोन फुफ्फुस, हृदय, मूत्रपिंड हाडे, कातडी, त्वचा, नसा, पांढऱ्या पेशी आणि चेहरादेखील दान करता येतो, असे सांगून डॉ. सेठिया म्हणाले की, भारतात १९४८ मध्ये पहिले अवयव दान झाले. नेत्रतज्ञ डॉ. आरईएस मुथ्यया यांनी सर्वप्रथम नेत्र प्रत्यारोपण केले. पहिले हृदयरोपण ३ ऑगस्ट १९९८ रोजी एम्सचे डॉ. वेणूगोपाल आणि त्यांच्या टीमने देवीराम या व्यक्तीवर केले. त्यानंतर हा व्यक्ती २१ वर्षे जिवंत राहिला. त्यामुळेच भारतात ३ ऑगस्ट हा अवयव दान दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीच्या अवयव दान दिनाची थीम इतरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे कारण तुम्ही बनवू शकता ही होती. भारतात पहिले यकृत दान ललिता रघुराम या २८ वर्षीय पत्नीने आपल्या पतीसाठी केले आणि या दोघांचा संसार सुखी बनला. यावर आधारित ये जिंदगी हा चित्रपट निघालेला आहे, अशी माहिती देऊन डॉ.सेठिया म्हणाले की, कोणत्याही वयात अवयव दान करता येते. १०० मिनिटे वयाच्या जन्मजात बालकाचे आणि ९५ वर्षीय व्यक्तीचे किडनी दान, १०७ वर्ष व्यक्तीचे नेत्रदान आणि इतरांवर प्रत्यारोपण यशस्वी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. दुर्धर आजार असलातरी अशा व्यक्तींचे अवयव दान वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाच्या कामी येऊ शकते. संशोधन झाले तरच विज्ञान पुढे सरकेल. त्यामुळे अवयव दान चळवळ सुरू राहिली पाहिजे, असे ते म्हणाले. प्रत्येकवर्षी प्रत्यारोपणासाठी दीड ते दोन लाख किडनींची मागणी असते. प्रत्यक्षात मात्र चार टक्के किडनी दान होते. यकृताची मागणी ८० हजार असताना फक्त १८०० उपलब्ध होते. केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या सन २०२१च्या अहवालानुसार दरवर्षी रस्ते अपघातात दीड लाख लोक मृत्युमुखी पडतात. त्यातून फक्त ५५० जणांचे अवयव दान होते. मागणीच्या तुलनेत अत्यंत कमी अवयदान होत असल्याने गरजूंना प्राणास मुकावे लागते. अवयदानाचे सर्वाधिक प्रमाण स्पेनमध्ये आहे. तेथे १ कोटी मागे ३५०, अमेरिकेत २१९, इंग्लंडमध्ये १५० तर भारतात एक कोटी मागे फक्त ६ याप्रमाणे अवयव दानाचे प्रमाण आहे. आपण मृत्यू पश्चात अवयवदानाच्या माध्यमातून गरजूंना जीवनदान देऊ शकतो. त्यासाठी केंद्र सरकारच्या आरोग्य परिवार कल्याण मंत्रालयांतर्गत नोटो तर राज्य सरकारच्या सोटो आणि इतर अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अथवा ऑफलाइन अवयव दान संकल्पपत्र भरून देता येते. आपला एक संकल्प आठ ते दहा जणांना जीवनदान देऊ शकतो, अनेकांचे जीवन सुधरू शकतो, अशी साद डॉ. राजेश सेठिया यांना घेतली आणि या चळवळीसाठी समृद्धी ग्रुपला आपली सदैव साथ राहील, अशी ग्वाही दिली.

प्रास्ताविकपर भाषणात स्वाती मांडोत म्हणाल्या की, महिलांनी घराबाहेर पडून काहीतरी करावे, आपल्यातील कर्तृत्व दाखवावे यासाठी, ६० महिलांचा समृद्धी ग्रुप स्थापन करून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. अवयवदान जनजागृती हा पहिला आरोग्यविषयक उपक्रम आम्ही हाती घेतला असून, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमावर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राणी कुचेरिया यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. उमा गादिया यांनी मानले.

**मृत्यूपश्चात अवयवदान किती वेळेत व्हावे?**

मृत्यू पश्चात अवयव दान किती वेळेत केले जावे, याबाबतचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार हृदय व फुफ्फुस ४ ते ८ तासात, यकृत ६ ते १२ तास, मूत्रपिंड ३० तास, आतडे आणि स्वादुपिंड ६ तास, पांढऱ्या पेशी ३ दिवस, कातडी नसा, हृदयाच्या झडपा, डोळे २४, हाडे ३ -४ दिवस या कालावधीत झालेल्या अवयव दानाचे यशस्वी प्रत्यारोपण होऊ शकते. नेत्रदानाकडे जनतेचा कल बऱ्यापैकी वाढला आहे. मात्र नेत्रदानापूर्वी मृतदेह एसी, शीत शवपेटी अथवा पंख्याखाली ठेवू नये. त्यामुळे नेत्र शुष्क बनून प्रत्यारोपणासाठी अडचणी निर्माण होतात, अशी माहिती डॉ. सेठीया यांनी दिली.

# अंबडच्या जिल्हा परिषद शाळेत १९७२ च्या आठवणींना उजाळा

## १९७२ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन




**अंबड । प्रतिनिधी -** अंबड येथील जिल्हा परिषद शाळेतील १९७२ च्या विद्यार्थ्यांचे गेट-टू-गेदर रविवारी संपन्न झाले असून त्या काळच्या सर्व आठवणींना माजी विद्यार्थ्यांनी उजाळा देत दुष्काळी परिस्थितीत कसे शिक्षण घेतले याचेही कथन केले. यावेळी माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

अंबड शहरातील जिल्हा परिषद शाळेतील१९७२ चे माजी विद्यार्थी आज मोठ-मोठ्या पदावर विराजमान होवून सेवानिवृत्ती झालेले आहेत. जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी, मंडळधिकारी, तलाठी तर उद्योगपती, कोणी डॉक्टर, शिक्षिका, शिक्षक झालेले आहेत. आज अशाच १९७२ च्या आजी-माजी विद्यार्थ्यांचे अंबडच्या जिल्हा परिषद शाळेत कुटूंबियांसोबत एकत्र जमवून १९७२ च्या दुष्काळी परिस्थितीचा अनुभवासह त्या काळच्या शैक्षणिक परिस्थितीचा अनुभव उजागर केला. आजच्या गेट-टु- गेदारला माजी विद्यार्थ्यांचे नातूही उपस्थित होते.

यावेळी शिवप्रसाद लाहोटी, श्रीनिवास सोमाणी,विश्वासराव कुलकर्णी, डॉ. अरुण पाठक, सुभाष काळबंडे आदींची उपस्थिती होती. या अनेक विद्यार्थी पुणे, नागपूर अशा मोठ-मोठ्या शहरात नौकरी करत होते. त्यामुळे त्याच ठिकाणी काही स्थाईक झाले परंतु आजच्या दिवशी सर्वच जण कार्यक्रमासाठी उपस्थित राहीले. यावेळी सर्वांनी आपले अनुभव, आपआपला परिचय करुन देत हे स्नेहमिलन साजरे केले.

# संत गाडगे बाबा यांना आदरांजली!

**जालना । प्रतिनिधी -** येथील संत गाडगेबाबा शॉपिंग कॉम्प्लेक्स.बसस्टँड रोड जालना येथे थोर समाजसुधारक राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी थोर समाजसुधारक राष्ट्रसंत गाडगे बाबांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यावेळी उपस्थित मान्यवरांनी समयोचित मार्गदर्शन केले. राष्ट्र संत गाडगे बाबा यांचा जन्म शेंडगाव ता. दर्यापूर जि. अमरावती येथे दि. २३ फेब्रुवारी १८७६ झाला. राष्ट्रसंत गाडगे बाबा महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक होते. त्यांनी स्वेच्छेने गरीब रहाणी स्वीकारली होती. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांना भटकत असत. गाडगे महाराजांची सामाजिक न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयांत जास्त रुची होती. विसाव्या शतकातील समाजसुधार आंदोलनांमध्ये ज्या महापुरुषांचा सहभाग आहे, त्यापैकी एक महत्त्वाचे नाव गाडगे बाबा यांचे आहे. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना




आपले गुरू मानीत. 'मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा (प्रामुख्याने वर्हाडी बोलीचा) उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. 'देवभोळ्या माणसापासून ते नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे.' असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते. गाडगे महाराजांची चरित्र ं यावेळी उलगडून दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी परिट धोबी समाजाचे अध्यक्ष श्री गणेश सर्वे, सुरेश कुंडलीकर, संतोष चौधरी, विजेंद्र कोंडेकर, नागेश सर्वे, नरेश कुंडलीकर, सौ. लताबाई कोपरेकर आदींची उपस्थिती होती.

## जालना जिल्ह्यातील ६४ पैकी १५ प्रकल्पांमध्ये मृतसाठा शिल्लक

**जालना -** जिल्ह्यातील ६४ पैकी १५ प्रकल्पांमध्ये आता मृतसाठा शिल्लक आहे. तर उर्वरित मध्यम प्रकल्पामध्ये ३५ टक्केच उपयुक्त पाणीसाठा उरलेला आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच जिल्ह्यातील लघु, मध्यम प्रकल्पामधील पाणीसाठ्यात घट होत आहे. उन्हाची तीव्रता वाढत चालल्याने पाणीटंचाईच्या झळा बसायला सुरुवात झाली. जिल्ह्यात गतवर्षी अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे जिल्ह्यातील लघु, मध्यम आणि मोठे प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले नाही. एप्रिल आणि मे महिन्यात नागरिकांना पाणीटंचाईला समोर जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# छत्रपती संभाजीनगर येथील कराटे स्पर्धेत जालना 'शाईन'

## जालना जिल्हा शाईन कराटे-डु असो.ने मिळविले ३३ पदके



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त छत्रपती संभाजी नगर येथे झालेल्या कराटे स्पर्धेत जालना जिल्हा शाईन कराटे-डु असोसिएशन चे घवघवीत यश, ९ स्वर्ण पदक, ९ रजत पदक व १३ कांस्यपदक टोटल ३३ पदक जिंकून जालना जिल्ह्याने दुसरा क्रमांक अर्जित केला.

गोल्ड मेडल १) कु.निवांशी वलकट्टी २)कु. आराध्या खती ३) कु.प्राजक्ता राऊत ४) कु.अश्विनी आजगे ५)ओंकार गुट्टे

सिल्वर मेडल १)कु. वैष्णवी लुटे २)मल्हार पातुरकर ३)प्रशिक राऊत ४)सम्यक शहा ०५) चैतन्य भालेराव

ब्रॉन्झ मेडल १)कु.अनुष्का म्हेत्रे २) समीक्षा कर्रे३) कु.तन्वी खरटमल ४) कु.आरुषी वलकट्टी ५)कु.वैष्णवी लोखंडे ६)कार्तिक जांगिड ७)यश दुरोळे ८)मयुरेश भाले

काथा गोल्ड मेडल १) कु.आरुषी वलकट्टी २) कु. प्राजक्ता राऊत ३)कु. अश्विनी आजगे ४) मयुरेश भाले

सिल्वर मेडल १) कु.अनुष्का म्हेत्रे २) कु.वैष्णवी लोखंडे ०३)प्रशिक राऊत ०४) चैतन्य भालेराव

ब्रॉन्झ मेडल १) कु.निवांशी वलकट्टी २) कु.वैष्णवी लुटे ३) कार्तिक जांगिड ४) ऋषिकेश श्रीराम ५) देवेंद्र चिंचपुरे ६)मल्हार पातुरकर ७) देवेश कर्रे या सर्व विद्यार्थ्यांना सेन्साई रुपेन्द्र पारचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. महावीर ढक्का, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, मुख्याध्यापक श्री वानगोता, मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल, मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना पवार, व्यंकट राजू गुडला, श्री यादव, प्रशांत प्रेमभारती, रितेश जयस्वाल, गणेश श्रीराम व पालक वर्गांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# सर्वांसाठी शिवमहापुराण आदर्श आचारसंहिता - हभप सुनील महाराज

**परतूर । प्रतिनिधी -** श्री क्षेत्र रामेश्वर मंदिर परतुर येथे दि. २१ ते २७ फेब्रुवारी दरम्यान दररोज रात्री ७ ते १० महाशिवरात्री निमित्त श्री शिवमहापुराण कथा गावकरी व रामेश्वर गल्ली यांच्या सहकार्याने मोठ्या भक्तिभावाने व श्रोत्यांच्या उपस्थितीत आरंभ झाला आहे. भगवान शंकराची फक्त कथा ऐकु नका तर कथेतील आध्यात्म जाणुन घ्या, शिवमहापुराण कथा श्रवण केल्याने मनातील अनेक विकार दुर होऊन निर्मळ जीवन जगता येते, भगवान शंकराच्या चरीत्राचा विचार केला तर श्री शिव महापुराण हे सर्व जीव मात्राला जीवन जगण्याचा स्वतंत्र अधीकार आहे असे सांगते. धर्म, जात, पंथ या पलीकडे कर्तव्य महत्त्वाचे आहे व कसे आचरणात आणावेत हे कथेतुन ज्ञात होते व शिव महापुराण हे सर्वांसाठी एक आदर्श आचारसंहिता आहे. असे ह.भ.प. सुनील महाराज आष्टिकर यांनी सांगितले.

शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडित आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप या पासून मिळणाऱ्या फळांचे म्हणजे लाभाचे देखील वर्णन आढळतं. शिवमहापुराणा मध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिले आहे. ते आपणास सात दिवस चालणाऱ्या या कथे दरम्यान श्रवणास मिळेलच असेही सुनिल महाराज यांनी कथे प्रसंगी सांगितले.



संगीत कथेला तबलावादक श्री. निवास कुलकर्णी, गायन व सिंथ अनिल महाराज मुकीर तर सुंदर देखावे भरत महाराज उपाध्य हे करत आहेत. सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सप्ताह समीती यशस्वी प्रयत्न करत आहे. पहिल्याच दिवशी भाविकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. सर्वांनी या कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थ्यांच्या मागण्यांसंदर्भात सरकार सकारात्मक

## माजी खासदार हरिभाऊ राठोड



जालना । प्रतिनिधी - मुख्यमंत्री प्रशिक्षणार्थी योजनेतंर्गत कार्यरत असणाऱ्या युवक आणि युवतींच्या मागण्यांसंदर्भात महाराष्ट्रचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची खासदार हरिभाऊ राठोड यांनी भेट घेतली. एकनाथराव शिंदे यांच्याकडे प्रश्न मांडले. यावर सरकार सकारात्मक विचार करणार असल्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती माजी खा. हरिभाऊ राठोड यांनी माध्यमांना दिली. दिनांक २१/०२/२०२५ रोजी माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी मुख्यमंत्री प्रशिक्षणार्थी योजनेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या युवक आणि युवतींचा मागण्या संदर्भात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची भेट घेऊन मुख्यमंत्री प्रशिक्षणार्थी युवक आणि युवती यांच्या सेवेचा कार्यकाल वाढवून त्यांना सध्या कार्यरत असणाऱ्या आस्थापनेतच कायमस्वरूपी नोकरी देण्यात यावी ,या प्रमुख मागण्या करिता निवेदन सादर केले. सदर शासनाचा धोरणात्मक विषय असून, लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या विषयांवर तोडगा काढण्या करिता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या बरोबर चर्चा करून तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन दिले. एकनाथराव शिंदे यांच्या या निर्णया बद्दल आनंद व्यक्त होत आहे , मुख्यमंत्री प्रशिक्षणार्थी योजनेच्या सर्व युवक आणि युवतींना न्याय मिळावा म्हणून शिवसेनेच्या नेत्या, आमदार मनिषा ताई कायंदे आणि माजी खासदार हरिभाऊ राठोड हे पाठपुरावा करत आहेत. येणाऱ्या काळात योग्य तो निर्णय झाला नाही तर आझाद मैदान मुंबई, येथे साखळी उपोषण करणार असल्याचे माजी खासदार राठोड यांनी सांगितले आहे.



# रगपंचमीसाठी केशरी फुलांचे आगमन

## ग्रामीण भागात फुलली पळसाची झाडे

**सिंधीकाळेगाव । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील सिंधीकाळेगाव येथील रंगपंचमीपुर्वीच परिसरात बहरले पळस. रंगपंचमीच्या पर्यावरण नैसर्गिक रंग म्हणून अनेक ठिकाणी पळसाच्या फुलांचा वापर केला जातो. पळसाडे झाड केशरी रंगाच्या फुलांनी बहरल्याचे चित्र दिसत आहे. लाल केशरी रंगाने सुंदर अनुभव येत आहे लाल केशरी रंगाच्या फुलांनी बहरलेली पळसाची झाडे सध्या सर्वांचे लक्ष वेधुन घेत आहे.रंगपंचमी हा एक सण आहे. फाल्गुन कृष्ण पंचमी या तिथीला रंगपंचमी हा सण साजरा केला जातो.धुलिवंदनापासून सुरू होणाऱ्या वसंतोत्सवाला रंगपंचमीच्या दिवशी पाच दिवस पूर्ण होतात. रंग पंचमी म्हणजे सण. या दिवशी एकमेकांना वेगवेगळे रंग लावून आनंदोत्सव साजरा केला जातो.पळसाची फुले पाण्यात टाकून स्नान केले तर त्वचारोग नाहीसा होतो, असेही आयुर्वेदात म्हटले आहे. पळसाच्या बियांचाही औषधीसाठी वापर केला जातो. सध्या तर रंगपंचमीची चाहुल लागल्याने पळस हे वृक्ष फुलोरा पांघरूण नटलेला दिसत आहे.

# जालन्याच्या पासोडी शिवारात ५ मजुरांच्या मृत्यू प्रकरणी पोलिसांत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील पासोडी शिवारात ५ मजुरांच्या मृत्यू प्रकरणी पोलिसांत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झालाय. वाळूचा टिप्पर पत्र्याच्या शेडवर खाली केल्याने पत्रा तुटून पत्र्याखाली झोपलेल्या ५ मजुरांचा शेड खाली दाबून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना जाफ्राबाद तालुक्यातील पासोडी शिवारात काल घडली होती. या प्रकरणी १) संतोष शेषराव कोल्हे (वय ३४ वर्ष, रा. जाफ्राबाद) २) गोपाल अरुण गवळी (वय २९ वर्ष, रा. खापरखेडा ता. जाफ्राबाद) आणि ३) रवींद्र किशोरीलाल आनंद (वय ६२ वर्ष, रा. जालना) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ३ संशयितांची नावं आहेत. आरोपी चालक संतोष शेषराव कोल्हे याने टिप्पर क्र. चह २१ इक८२३२ मधील वाळू पत्र्याच्या शेडवर खाली गेली. त्या पत्र्याच्या शेड खाली पाच मजूर झोपले आहेत याची कल्पना असताना सुद्धा आरोपी चालकाने सदरील ट्रक हा त्याच्या दोन साथीदारांसह पत्र्याच्या शेड वर खाली केला. यामुळे पत्र्याखाली झोपलेल्या मजुरांचा अंगावर शेड चे ओझे पडून दुर्दैवी मृत्यू. दरम्यान चालकाने हा प्रकार का केला हे अद्याप समजू शकलेले नसून याप्रकरणी तीन जणांविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झालाय. या घटनेचा पुढील तपास जाफ्राबाद पोलिस करीत आहेत.

# वसंत राज्यस्तरीय आठव्या अद्याक्षर मुक्त कविता लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर!

**मुंबई । प्रतिनिधी -** भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संस्था मुंबई या संशोधन प्रशिक्षण संस्थेच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे वसंत ऋतूत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय आठव्या मराठी भाषा ऋतुराज वसंत मुक्त अद्याक्षर कविता लेखन स्पर्धेचे (फेब्रुवारी २०२५) नुकतेच आयोजन केले होते. ऑनलाइन स्वरुपात झालेल्या या काव्यलेखन स्पर्धेत अनेकानेक कवींनी सहभाग नोंदवला. कमीत कमी शब्दांत आशयघन व प्रेरणादायी शब्दरचना याशिवाय लेखनातील रचनावृत्त, शब्दलयता इत्यादी व अद्याक्षर रचना इत्यादी निकष यासाठी निश्चित केले होते.

यामध्ये राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रीमती सुचेता सावंत ( दादर ) यांना द्वितीय क्रमांक विभागून सौ. रिया लोटलीकर (बोरिवली ,मुंबई ), सौ. अन्वया काणे (विलेपार्ले ) व सौ. रंजना शिंदे (मुंबई) यांना

तृतीय क्रमांक विभागून सौ. वंदना माईन ( अंधेरी ), पुनम पतंगे (पनवेल ), सौ वसुंधरा मराठे (ठाणे), कु. इक्षिता फडके ( विलेपार्ले) यांना तर उत्तेजनार्थ कु. विनय सरदेसाई ( रत्नागिरी ) आणि सौ. सुजाता फडके ( विलेपार्ले ) यांना मिळाला.

सर्व विजेत्या कविवर्यांना संस्थेच्या परिवारातर्फे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संस्था मुंबई संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. आनंदसर व संस्था संबंधित मराठी भाषा व समिक्षा क्षेत्रातील विविध अभ्यासक,यांचे यासोबतच काव्य स्पर्धेच्या संयोजिका सौ.सुजाता आंबेरकर, व श्री शिवपद्म वडाळकर, स्पर्धा संयोजक श्री संदेश कदम यांचे यामध्ये योगदान लाभले.

# डेबुजी परिट समाज जालना आणि गुरू शिष्य परिवाराचा आगळा वेगळा उपक्रम

## अमरधान स्मशाभूमीतील संत गाडगेबाबा शांतीवनाचे लोकार्पण; रक्तदान शिबीर, स्वच्छतादुतांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नवीन जालना भागातील अमरधाम स्मशानभूमीत (शेरी) श्रमदानाच्या माध्यमातून कायापालट करून तेथे झाडे लावून, भिंतीची रंगरंगोटी करून त्यावर सुंदर सुविचार लिहून तेथे छोटेसे शांतीवन उभारून अंत्यविधीसाठी येणाऱ्यांना बसण्याची चांगली व्यवस्था केलेल्या संत गाडगेबाबा शांतीवनाचे लोकार्पण आज रविवारी (दि.२३) राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंतीचे औचित्य साधून करण्यात आले. डेबुजी परिट समाज जालना आणि गुरू शिष्य परिवाराच्या संयुक्त विद्यमाने छोटेखानी सोहळा स्मशानभूमीत साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा तसेच स्म शानभूमीत श्रमदान करून स्वच्छता राखणाऱ्या स्वच्छतादुतांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यानिमित्त स्मशानभूमीत रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी ३० दात्यांनी रक्तदान करून मानवतावादी कार्यास हातभार लावला.अमरधाम स्मशानभूमीत करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा परीट समाजाचे माजी जिल्हाध्यक्ष सुभाषराव वाघमारे हे होते तर बदनापूरचे माजी आ. संतोष सांबरे, प्रसिध्द कवयित्री संजिवनी तडेगावकर, प्रसिध्द साहित्यिक प्रा. बसवराज कोरे, पंडीतराव लव्हटे, परीट समाजाचे जिल्हाध्यक्ष किशोर आगळे, लोकम ान्य शाळेचे मुख्याध्यापक विजय उबरहंडे, निलेश नन्वरे, श्रीमती करूण हिवाळे, श्रीमती उबरहंडे, डेबुजी समाज आणि गुरू शिष्य परिवारचे संस्थापक किशोर खंडाळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त सकाळच्या सत्रात जनकल्याण



रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी दोन्ही परिवारातील ३० सदस्यांनी रक्तदान केले. त्यानंतर दुपारच्या सत्रात मुख्य कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांचे श्रीमती मिना इंगळे, श्रीमती लता मेव्हणकर, मिना वाघमारे, किशोर खंडाळे, गणेश इंगळे, रमेश पैठणकर, हर्ष म ेव्हणकर, अरूण सुरूसे यांनी स्वागत केले. त्यानंतर अरूण सुरसे, लक्ष्मण उजेड, मच्छिंद्र उजेड, शिवराज उजेड, दिनेश उजेड, योगेश वाघम ारे, बळीराम मोरे, चंद्रशेखर ठाकुर, रामेश्वर फड यांचा आदर्श परिवार सदस्य म्हणून तर संत गाडगेबाबा शांतीवनात सुविचार अंकीत करणारे पेंटर तथा गायक शेख जमील यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना प्रसिध्द कवयित्री डॉ. संजिवनी तडेगावकर यांनी खंडाळे गुरूजी यांच्या कार्याचे कौतूक करून स्मशानभूमीतील कार्य निष्काम असल्याचे सांगून सर्वांनी या कार्याला साथ देवून सातत्य टिकवून ठेवावे, असे आवाहन केले. माजी आ. संतोष सांबरे यांनी स्मशानभूमीतील या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे कौतुक करीत आपण आपल्या आयुष्यात पहिल्यांदाच स्मशानभूम ीत एखाद्या कार्यक्रमाचे भाषण करीत असल्याचे सांगितले. संत गाडगेबाबांच्या पंचसुत्रीचा सर्वांनी अंगिकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रा. बसवराज कोरे यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्याची आठवण करून देत बाबा हे आपल्या आयुष्याची प्रेरणा असून आपल्या जडणघडणीत त्यांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव असल्याचे ते म्हणाले.

यावेळी अमरधाम स्मशानभूमीत नियमीत श्रमदान करून परिसर स्वच्छ राखण्यात मोलाची भूमि का बजावत असल्याबद्दल रमेश पैठणकर,रोषण इंगळे, सचिन शिंदे, सचिन शेलार, गणेश मेव्हणकर, नकुल राऊत, विवेक पाटील, राम दास हजारे, गणेश वाघमारे, निलेश नन्नावरे, संतोष रेगुडे यांचाही शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यावेळी प्रास्तविक सुनिल ढाकरके यांनी केले. कार्यक्रम ाचे सुत्रसंचलन गौतम मोरे यांनी केले तर योगेश मोरे यांनी आभार मानले. यावेळी अशोकराव खंडाळे,सुरेशराव वाघमारे, अशोकराव जाधव, अनिल खंडाळे,काशिनाथ मेव्हणकर, संतोष शिंदे, जगतकुमार घुगे,सुभाष घोडके, डिगंबर जाधव, संजय आगळे, बाबासाहेब उजेड,ज्ञानेश्वर निक्कम, सोमेश कोळी, अविनाश कुलकर्णी, प्रदीप देशपांडे, गोपाल शिंदे, जालिंदर लाड, बाबासाहेब ओळेकर, राजेश शेलार,अतुल खंडाळे, कल्पना पेंटेवाड, श्रीमती करुणा हिवाळे यांच्यासह डेबुजी समाज जालना आणि गुरू शिष्य परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्मशानभूमीत रंगली मैफल

एरव्ही स्मशानभूमी म्हटलं की, दुख व्यक्त करण्याची जागा असते, सहसा स्मशानभूमीत कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम घेतले जात नाहीत. परंतू डेबुजी समाज जालना आणि गुरू शिष्य परिवाराचे संस्थापक किशोर खंडाळे गुरूजी यांनी पुढाकार घेत सर्वांच्या सहकार्याने अमरधाम स्मशानभूमीतील पडीत असलेल्या जागेचे रूपांतर सुंदर अशा बागेत केले. अंत्यविधीला येणाऱ्यांसाठी बसण्याची निवांत जागा, चोहीकडे झाडे, शोभीवंत फुले, रंगरंगोटी केलेल्या भिंती, भिंतीवरील सुविचार, पशु पक्ष्यांसाठी दानापाण्याची सोय अशी सर्व व्यवस्था असलेल्या संत गाडगेबाबा शांतीवनाची उभारणी केली. या शांतीवनाच्या लोकार्पण प्रसंगी माजी आ. संतोष सांबरे यांनी सुंदर मराठी भावगीत, कवयित्री डॉ. संजिवनी तडेगावकर यांनी सुंदर कविता आणि पेंटर शेख जमील यांनी गझल गावून स्मशानभूमीत जणू मैफलच रंगविली. सर्वांनी या मान्यवर कलावंतांना भरभरून दाद दिली.

# अभिजीत जाधव याचे एमपीएससी परीक्षेत यश

**अंबड । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील ग्रामीण भागात शिक्षण घेणारा विद्यार्थी अभिजीत जाधव याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत यश मिळवून मोठे यश साधले आहे. अंबड तालुक्यातील दहेगाव खुर्द येथील अभिजीत जाधव याने सरकारी पदांवर निवड मिळवून आपल्या जिल्ह्याचे व तालुक्याचे नाव उंचावले आहे.अंबड तालुक्यातील संदीपान जाधव यांचा मुलगा अभिजीत जाधव याची एमपीएसी परीक्षेत अन्नसुरक्षा अधिकारी (एफएसओ) म्हणून निवड झाली आहे.अभिजीतचा शैक्षणिक प्रवास ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतून सुरू झाला. त्याने इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत शिक्षण दहेगाव खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत घेतले,तर पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण जालना येथील पार्थ सैनिकी स्कूलमध्ये झाले.अभिजीतने बीएससी शिक्षण सरस्वती भवन महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथून पूर्ण केले. त्याच्या यशाचे श्रेय त्याच्या अथक परिश्रमाला,जिद्दीला आणि चिकाटीला जाते.या निवडीबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# दादर येथे मराठी भाषा दिवस कार्यक्रम

**मुंबई -** मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, धुरु हॉल ट्रस्ट आणि दादर सार्वजनिक वाचनालय व मराठी विचारधारा प्रतिष्ठान गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ रोजी सायंकाळी ५. ३० वाजता छबीलदास रोड, धुरु हॉल येथे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज जन्मदिन मराठी भाषा गौरवदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ पत्रकार सचिन परब, आमदार आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, कामगार नेते दिवाकर दळवी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत. 'कृत्रिम बुद्धिमत्ता (ए आय ) तंत्रज्ञान मराठी भाषेसाठी किती उपयुक्त' या विषयावर ३० वर्षे संगणक क्षेत्रात अध्यापन करणारे सुप्रसिद्ध भानुदास साटम यांचे व्याख्यान होणार आहे. त्याचप्रमाणे संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या आणि महाराष्ट्र तसेच इतर राज्यातून व अमेरिका, शिकागो, सिंगापूर येथून आलेल्या ४९ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा तसेच अभिजात मराठी भाषा चला ज्ञानभाषा करूया या लेखस्पर्धेचे पारितोषिक वितरण होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी चितळे बंधू उद्योगाचे सहकार्य लाभले आहे. अधिक माहितीसाठी संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांच्याशी ९३२३११७७०४ संपर्क साधावा असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी केले आहे.

युवा आदर्श

**संमेलनसण ...**

साहित्य संमेलन ही
पर्वणी सुखाचे क्षण
ईद नाताळ दिवाळी
एकत्र सगळे सण
शारदा प्रांगणातले
वेचून घ्या कणकण
वाटता एकमेकांना
वाढत जाय सद्गुण
चर्चा सत्रे ज्ञानगंगा
समाज मना जाग्रण
ऐक व्याख्यानमाला
अनुभवांचे संग्रहण
वादग्रस्त विषयांनी
ना लागो उगा ग्रहण
काव्य मैफिली रमा
करावे आनंद गृहण
सोहळा सुखे संपन्न
नितळ हो तारांगण
साहित्यीक रसीक
उजळू निघो आंगण
पुस्तक दालने सजे
रसिका हरीत कुरण
वाचन संस्कृती वृध्दी
विक्रीस हवे स्फुरण
सारस्वत मेळाव्यात
दूर ठेवी राजकारण
अनावश्यक ठरावाने
ना गाजावे रणांगण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.